PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 2

# झेंडा सत्याग्रहाची नागपूर व चंद्रपूर मधिल प्रतिक्रिया

**प्रा. डॉ. कैलास रामचंद्र भांडारकर**
सहायक प्राध्यापक इतिहास विभाग
शिवाजी महाविदयालय गडचिरोली
जिल्हा गडचिरोली ४४२६०५
**महाराष्ट्र भारत**

१ आगस्ट १९२० ला लोकमान्य टिळकांचे निधन झाले आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेशची धुरा राष्ट्रपिता महात्मा गांधींकडे आली.[१] २६ डिसेंबर १९२० रोजी चक्रवर्ती विजयराघवाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली नागपूराला राष्ट्रीय कॉंग्रेशचे अधिवेशन भरले.[२] या अधिवेशनात असहकार ठरावाला विस्तृत स्वरुप देण्यात आले.[३] या अधिवेशनाला चंद्रपूर व चीमूर येथील कॉंग्रेश कार्यकर्ते उपस्थित होते .[४] त्यांनीच चंद्रपूर जिल्हयात असकार आंदोलनाचे लोन प्रसारीत केले. संपूर्ण चंद्रपूर जिल्हयात व्याख्यानाच्या माध्यमातून वृत्तपत्रे आणि राष्ट्रीय पूढारांच्या छायाचित्र विक्रीव्दारे बहिष्काराच्या व्दारे सरकारी नोकरीवरील बहिष्कार व्दारे असहकार चळवळीचा प्रसार व प्रसार केला तसेच राष्ट्रीय शिक्षणाचा अंगीकार केला.[५]

या चळवळीमूळे चंद्रपूर जिल्हयातील असहकार चळवळीला अधिक चालणा मिळाली. खेडयापाडयातील लोक स्वातंत्र आंदोलनात उत्साहाने सहभागी होवू लागले म्हणजेच चंद्रपूर जिल्हयात स्वातंत्र लढयाने भारलेले वातावरण निर्माण झाले होते अशातच ११ जून १९२२ रोजी सेनापती बापटानी मुंबई येथे मुळसी परिषद भरविली आणि २ सप्टेंबर १९२२ ला

मुळसी सत्याग्रहाचे नेतृत्व केले.[६] या सत्याग्रहात चंद्रपूरचे सदाफळे वकिल व झिगोंबाजी धुंडे सहभागी झाले.[७] त्यात झिगोंबाजी धुंडे याना ६ महिण्याची तर विठ्ठल धोंडू चंदनवार यांना तिन महिण्याची तुरुंगवासाची शिक्षा झाली.[८]

यानंतरची महत्वाची घटना म्हणजे मे १९२३ पासून नागपूर येथे सुरु झालेले झेंडा सत्याग्रह होय. या सत्याग्रहात देखील चंद्रपूर जिल्हयाचा फार मोठा वाटा आहे.[९]

झेंडा सत्याग्रहाची मूळ कल्पना जबलपूर येथील असून तिला मूर्त स्वरुप देण्याचे कार्य पंडित सुंदरलाल यांनी केले.[१०] १८ मार्च १९२३ रोजी म. गांधींच्या कारावासानिमित्त जबलपूर येथे पं. सुंदरलाल यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय झेंडा घेवून मिरवणूक काढण्यात आली. सरकारने लगेच त्यांना अटक केली.[११] ही घटना देशाच्या संदर्भाात अपमानस्पद असून त्यातूनच सत्याग्रह चळवळीला सर्वसमावेशक स्वरुप प्राप्त झाले. त्यासाठीच नागपूर हे सत्याग्रहाचे प्रमुख केंद्र बनविण्यात येवून वर्ध्याच्या जमनलाल बजाज यांनी या चळवळीला संघटित करण्याची जबाबदारी स्विकारली. संपूर्ण भारतातून या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी स्वयंसेवकांना नागपूर येथे पाठविण्याचा आदेश देण्यात आला. १३ एप्रिल जालीयनवाला बाग हत्याकांडाच्या निमित्त हे सत्याग्रह १३ एप्रिल १९२३ रोजी सुरु करण्याचे निश्चित करण्यात आले.[१२] १३ एप्रिल १९२३ रोजी जनरल मंचरशा आवारी यांच्या नेतृत्वाखाली ३६ कार्यकत्यर्चा एका तुकडीने राष्ट्रीय ध्वज हातात घेवून एक भव्य मिरवणूक नागपूरातील सिव्हील लाईनच्या दिशेने काढली.[१३] मिरवणूक सिव्हिल लाईनमध्ये पोहचताच डे कमिशनर, मि. गोवेन आणि पोलीस अधिका-यांनी मिरवणूक अडविली. लष्करी तुकडी यावेळी सज्ज होतीच. पोलीस कप्तान मि. स्मिथ यांनी मिरवणुकीवर हल्ला केला. ब-याच सत्याग्रहींना जबर मारहान करुन जवळच्या नालीत ढकलण्यात आले.[१४] आणि सर्व पूढा-यांना ६० रुपये आर्थिक दंड किंवा दोन महिण्याची शिक्षा ठोठावली.[१५] तर कॉग्रेस कार्यकत्यांनी जोपर्यंत इंग्रज सरकार झेंडाबंदी निर्णय मागे घेत नाही तोपर्यंत झेंडा सत्याग्रह सुरुच ठेवायचा अशी ठामपणाची भूमिका घेतली आणि म्हणूनच जमनालाल बजाज व पंडित भगवान दिन यांच्या नेतृत्वाखाली १ मे १९२३ रोजी पुन्हा सत्याग्रह प्रारंभ करण्यात आला.[१६] या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी प्रति दिन प्रांता

प्रांतातून तुकडया येथे असून सत्याग्रहात सुभद्राकुमारी चौहान.[१७] यांनी जबलपूर वरुन एक मोर्चा नागपूरला आणून सत्याग्रहात भाग घेतला.[१८] अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीने या आंदोलनाला पाठिंबा दिला आणि तत्कालीन अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटिचे अध्यक्ष डॉ. अन्सारी यांनी सर्व प्रातांना नागपूर सत्याग्रहात सहभागी होण्याची विनंती केली.त्याप्रमाणे दररोज स्वयंसेवकांच्या तुकडया नागपूरला येत होत्या. परिणामत सत्याग्रह सुरु राहण्यास मदत झाली.[१९] चंद्रपूर जिल्हयानेदेखील या सत्याग्रहात मोठया उत्साहाने भाग घेतला. चंद्रपूर वरुन बाजीराव फुलझेले आणि त्यांची पत्नी गोपीबाकाई फुलझेले यांनी सत्याग्रही म्हणून भाग घेतला.[२०] तसेच भाई पैकन पाडगेलवार यांनी देखील या सत्याग्रहात भाग घेतला होता.[२१] १८ जून १९२३ ही तारीख झेडा सत्याग्रहकरण्यासाठी निश्चित करण्यात आली.[२२] ब्रिटीश शासनाला याची चाहूल लागताच साम,दाम दंड, भेद नीतीचा अवलंब करुन सत्याग्रहाचा विमोड करण्याचा प्रयत्न केला आणि एका दिवसाच्या पूर्वी १७ जूनलाच सत्याग्रहाचे प्रमुख जमनालाल बजाज, भगवान दिन, निलकंठराव देशमुख यांना अटक केली.[२३] वरील सत्याग्रहींना अटक केल्याच्या निमित्त चंद्रपूरला बालगोविंद थिअटरमध्ये एक सभा घेण्यात आली. या सभेला खुशालचंद खजांची, मा.सा. कन्नमवार, अब्दुल रझक हनफी, बालगोविंद पंडित व गावातील ३०० लोक उपस्थित होते. या सभेतच खुशालचंद खजांचीने आपल्या भाषणातून ब्रिटीश सरकारबाबात खेद व्यक्त केला.[२४] ठरल्याप्रमाणे १८ जूनला विनोबाजी भावे यांच्या नेतत्वात सत्याग्रह पार पडला. सरकारने विनोबाजी भावेसहित २७५ सत्याग्रहींना अटक केली. सत्याग्रहाचे व्यापक रुप पाहण्यासाठी पं. जवाहरलाल नेहरु , पुरुषोत्तम टंडन, कवी माखनलाल चतुर्वेदी.[२५] ( फुलोचाह ही कविता) इत्यादी प्रभूति मंडळी उपस्थित होती. या सत्याग्रहाचे व्यापक स्वरुप पाहून नागपूरच्या कमिशनर ने रेल्वे स्टेशनवर सत्याग्रहींना अटक कली. जुलैच्या शेवटपर्यंत अटक केलेल्यांची संख्या २१९ पर्यंत पोहचली.[२६] झेंडा सत्याग्रहींनी जो शांताता मोर्चा १८ जून १९२१ रोजी आयोजित केला त्यात मोहन व अभिमन्यू ही दोन मुले १०० सत्याग्रहींच्या मिरवणूकी पुढे स्फूति दायक व देशभक्तीने भारावलले गीत गात होते. त्यात

नही झुके गा, नही झुकेगा, कौमी झेंडा कभी नही,
भारत भू की राष्ट्रपताका झुक सकती क्या कभी कही
वीर शीस बत्तीस कोटि पर कौमी झंडा खडा हुआ,
इसकी रक्षा हेतु वतन का बच्चा-बच्चा अडा हुआ [२७]

या मिरवणूकित डॉ. राजेद्रप्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, सुभद्राकुमारी चौहान व त्याचे पती लक्ष्मणसिंह ठाकून, पूनमचंद राका हे नेते हजर होते. या दिवशी ब्रीटीश सरकारने एकाही सत्याग्रहीला अटक केली नाही हा भारताचा फार मोठा विजय होता.[२८]

१८ ऑगस्ट १९२३ रोजी नागपूर येथील 'टाऊन हॉल' मैदानावर विराट सभा होवून त्यात सरदरा वल्लभभाई पटेलांनी सत्याग्रहीचे अभिनंदन करुन सत्याग्रह थांबविण्याची घोषणा केली .[२९] या सत्याग्रहाचे चंद्रपूर जिल्हयातील वरोरा येथे पडसाद उमटले वरो-याचे चुन्नीलाल कलेदिया यांनी झेंडा सत्याग्रहाची चळवळ उचलून धरली

"झेंडा उंचा रहे हमारा,
विजयी विश्व तिरंगा प्यारा,
चरखा चला चलाकर लेंग स्वराज."

अशा घोषणा करुन राष्ट्रीय व स्वदेशी भावना उंचबळून येईल, स्वातंत्रासाठी मनोबल वाढावे म्हणून प्रभातफे-या व सभा घेवून जनजागृती केली- त्यात त्यांना जसराज गोठी, गुलाबचंद गोठी यांचे सहकार्य लाभले.[३०] चंद्रपूरच्या झिगोबाजी धुडेसोबत गेलेल्या जथ्याची तुरुगवासातून सुटका झल्यानंतर चंद्रपूरच्या गांधी चौकात त्याच जाहिर सत्कार करण्यात आले. या स्वागताचे नेतृत्व पं. बालगोविंद आणि तत्कालीन नगर परिषदेचे अध्यक्ष खुशालचंद खजांची व त्यांच्या सहका-यांनी केले.[३१] अशाप्रकारे नागपूर येथील झेंडा सत्याग्रहाने भातीयांच्या ब्रिटीश विरोधी आंदोलनाला नवजीवन देवून संघर्ष सुरु ठेवण्याच्या विचारांना सुरक्षित ठेवण्यास मदत केली या सत्याग्रहात उपरोक्त विवरणा वरून चंद्रपूर जिल्हाने फार मोठे योगदान दिल्याचे स्पष्ट होते.

## संदर्भ

१. वैदय डॉ. सुमन कोठेकर डॉ. शांता   महाराष्ट्रातील कॉग्रेशचा स्वातंत्र लढा - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मंबई १९८५ पा. १३५

२. Collected Work of Mahatama Gandhi Voll. XIX Gov. of India New Delhi 1975 Page No. 198

३. बिपन चंद्र (मराठी अनूवाद डॉ.एम.व्ही काळे) भारताचा स्वातंत्र संघर्ष- के सागर प्रकाशन पूणे २००३ पा. 216

४. कन्नमवार मा.सा.   पूज्य पंडीतही -चांदा छापखाना चंद्रूपर १९६६ पा. २४

५. मिश्रा पं. भगवतीप्रसाद   भारतीय स्वतंत्र संग्राम में चंद्रपूर - रमा प्रकाशन चंद्रपूर १९८६ पा. १२५

६. चौधरी के.के. भारतीय स्वतंत्रता संग्राम और महाराष्ट्र पा. ७०

७. मिश्रा पं. भगवतीप्रसाद पा. १४८

८. फाटक न.र.  स्वातंत्र सैनिक चरित्र कोष- विदर्भ विभाग खंड १ इतिहास समिती कार्यालय म.रा. मुंबई १९७१ पा. ३०५

९. कित्ता पा. ३५३

१० कोलारकर डॉ. श.गो.आधिुनिक विदर्भांचा इतिहास- मंगेश प्रकाशन २००३ पा. १०६

११ कानेटकर मा.ज.   भाग २ प्रकरण ४ पा. ३३-३४

१२ मिश्रा व्दारका प्रसाद मध्यप्रदेश मे स्वाधीनता आंदोलन का इतिहास मध्यप्रदेश प्रकाशन भोपाल पा. ३३१

१३ कित्ता

१४ कानेटकर मा.ज. भाग २ प्रकरण ४ पा. ३५

प्रा. डॉ. कैलास रामचंद्र भांडारकर

१५ मिश्रा व्दारका प्रसाद पा. ३३९

१६ कित्ता

१७ चौव्हान सुभद्रकुमारी खुब लढी मरदानी वह तो झाशीवाली राणी थी प्रसिध्द कविता

१८ मिश्रा व्दारका प्रसाद पा. ३३९

१९ कित्ता पा. ३४०

२० मिश्रा प. भगवतीप्रसादपा. १३४

२१. कुचीनकर डॉ.एस.जी स्वातंत्र सग्राम सैनिक स्मरणीका (चंद्रपूर जिल्हा) १९८६ पा. २५

२२ मिश्रा व्दारका प्रसाद पा. ३४१

२३ अंधारे डॉ. भा.रा. संशोधन शिंपले भाग २ - विश्वभारती प्रकाशन नागपूर १९९९ पा. ७१

२४ कन्नमवार मा.सा. पूज्य पंडीतजी पा. ८८

२५ कवि चतुर्वेदी मख्खनलाल यांची फुलो चाह प्रसिध्द कविता

२६ मिश्रा व्दारका प्रसाद पा.३४१

२७ कित्ता पा. ३४२

२८ अंधारे डॉ. भा.रा.पा. ७२

२९ कित्ता

३० वृत्तपत्र देशनायक २६ ऑक्टोंबर १९९७

३१ काटकर तु.ना. गुप्ता प्रा.रमेश चंद्रपूरचा सिंह नवजिवन प्रकाशन चंद्रपूर १९७१ पा. ३४ नवजिवन प्रकाशन चंद्रपूर १९७१